## गृह विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ नोव्हेंबर २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक सीएलआर-०६२१/प्र.क्र.९०/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतुद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख), (छ) आणि (ज१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना नियम “मुंबई विदेशी मद्य नियम (तिसरी सुधारणा) नियम, २०२१” असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम २५ मधील, उप नियम (४) मध्ये,—

(एक) खंड (ब) मध्ये, खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे, जसे की,—

“परंतु, स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांची संख्या ही चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी अस्तित्वात असलेल्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांच्या एकूण संख्येच्या ३० टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये.”;

(दोन) खंड (क) मध्ये,—

(अ) पहिल्या परंतुकामधील, “चंद्रपूर जिल्हा वगळून” हे शब्द वगळण्यात यावेत ;

(ब) दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात यावे. जसे की,—

“परंतु, आणखी असे की, चंद्रपूर जिल्ह्याच्या बाबतीत स्थलांतरीत होणाऱ्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांची संख्या ही दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांच्या एकूण संख्येच्या १५ टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उपसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Kama Road, Hutatama Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 8th November 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. CLR-0621/C.R.90/Excise-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force with immediate effect and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b), (g) and (h1) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Third Amendment) Rules, 2021.

2. In rule 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in the sub-rule (*4*),—

(i) in clause (*b*), following proviso shall be added, namely :—

"Provided also that, the number of licensed shops for such shifting shall not exceed 30% of the total existing licensed shops in Chandrapur District as on the 31st March 2015.";

(ii) in clause (*c*),—

(*a*) in the first proviso, the words "other than Chandrapur district" shall be deleted;

(*b*) after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided also that, in case of Chandrapur District the number of licensed shops for shifting shall not exceed 15% of the total licensed shops existing in the Chandrapur district as on the 31st March 2015.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.